# MT- 162

Seat No. | | | | | | |

2014 .... .... 1100

MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM II - PAPER - VI

Time : 3 Hours (Pages 5) Max. Marks : 80

---

**प्र.1. अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** **4**

1) पर्यायी विकासशैली यांचा ..........
   अ) विचार करायला हवा. ब) विचार करायचा.
   क) विरोध करायला नको का ?

2) खेळ सुरू करण्यापूर्वी आम्ही अर्धा ते एक तास ..........
   अ) सूतकताई करीत असू. ब) बागेत काम करत असू.
   क) मैदान साफ करत असू.

3) बागेत फेरफटका मारावा, पुन्हा पुन्हा ..........
   अ) झाडांपाशी बसावं. ब) कारंज्यापाशी बसावं.
   क) टेबलाशी येऊन बसावं.

4) रविवर्मा तसाच बंगलीच्या प्रवेशद्वारी गेला; आणि त्याच वेळी ..........
   अ) स्वामी समर्थांचं दर्शन त्याला झालं. ब) स्वामी विवेकानंदाचं दर्शन त्याला झालं.
   क) स्वामी रामदासांचं दर्शन त्याला झालं.

**प्र.1. आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** **3**

1) ती एकमेकांशी बोलताना .......... कुणाला आढळायची नाहीत.
   (बहुधा, सहसा, बऱ्याचदा)

2) .......... म्हणजे केवळ दोन बिंदूंना जोडणारं अंतर नव्हे. (रस्ता, रेषा, रेघ)

3) पन्हाळ्याचे आठ दिवस .......... निघून जात. (वाऱ्याबरोबर, भुर्रकन, सहजच)

**प्र.1. इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

1) 'माझे विद्यापीठ' या काव्यसंग्रहास एकूण किती पुरस्कार मिळाले ?

2) घर परमनंट होण्यासाठी नागिणीच्या पोरांनी मातीत काय मिसळायला सुचवले ?

3) चंद्र होऊन कशाची विजार घातली ?

**प्र.2. अ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **3**

1) ''वेदनेचे आनंदात कसे रूपांतर होईल हा ध्यास या पतीपत्नीला लागला.''
2) ''मुलांच्या सुखातच बापाचं सुख असतं.''

**प्र.2. आ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

1) ऋतुबदलाचा आनंद लेखिका कोणत्या प्रकारे साजरा करू इच्छिते ?
2) 'सुर्वे यांच्या कवितेतील भाव मला समजत नसे' असे कृष्णाबाई का म्हणतात ?
3) 'भारत छोडो' आंदोलनात लेखक चंद्रशेखर धर्माधिकारी कशा प्रकारे सहभागी झाले ?
4) पन्हाळ्याचा दरगाह म्हणजे हिंदू-मुस्लिमांच्या एकतेचे प्रयत्न केलेल्या वलींचे स्थान आहे, असे लेखिका आशा आपराद का म्हणतात ?
5) निसर्गाला नित्यनव्याचा सोस असतो, असे का म्हटले आहे ?

**प्र.3. अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

1) खरे सुख कशात नाही ?
2) मातीला कशाचा सुगंध यावा, असे कवीला वाटते?
3) घरट्यात कपाळाला काय पडत नाही ?

**प्र.3. आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** **3**

1) नको मंत्र त्याला .......... (मुनिब्राह्मणांचे, देवदेवतांचे, वेदोपनिषदांचे)
2) डोळ्यापुढती येतो जेव्हा .......... गाव. (आठवणीचा, मनातला, स्मरणातला)
3) आपण जिजाऊच्या .......... (पाती, साथी, जाती)

**प्र.4. अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** **3**

1) 'अवघा निरसला शीण । देखतां संतचरण ।।
आजि दिवाळी दसरा। सेना म्हणा आले घरा ।।'
2) 'नभी फडफडे उंच तिरंगा, मनात गंगा, हिमनग रांगा
चंद्र, सूर्य अन् इथली माती यांना अमुचे लाख प्रणाम ।।'

**प्र.4. आ) कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

1) कवीच्या मनातील बेचैनीचे भाव केव्हा नाहीसे होतात ?
2) संत सोयराबाई यांनी संसाराची तुलना मृगजळाबरोबर कशी केली आहे ?
3) कवीच्या मते, परमेश्वराचे दर्शन कोठे-कोठे घडते ?

4) प्रलय होताना कोणकोणता बदल कवीला अपेक्षित आहे ?
5) माझ्या घरट्यात कोणत्या गोष्टी नाहीत, असे कवी म्हणतो ?

**प्र.5. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** **8**

1) पाण्याचे महत्त्व, अम्मा पत्रातून कशी लिहिते ?
2) 'गावाची संस्कृती स्थानिक परंपरांतून निर्माण झालेली असते.' हे विधान पाठाच्या आधारे सोदाहरण स्पष्ट करा.
3) स्वातंत्र्यचळवळीत कोणकोणती विधायक कामे केली गेली ?
4) जुईचे आईबाबा घरी कोणती कामे करतात?

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** **8**

1) 'नातवंडास पत्र' या पाठाचा सारांश लिहा.
2) 'प्रतिसरकार' या पाठाचा सारांश लिहा.

**प्र.6. अ) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार लिहा.** **2**

1) सार्‍या जातीपातिंचे, धरमांचे अडसर ओलांडायचे.
2) भगवा अंघरखा आणि त्याच रंगाचं पाई धोतर होतं.

**प्र.6. आ) खालीलपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** **2**

1) वृक्षलता 2) पैसाअडका 3) तीमजली 4) यशापयश

**प्र.6. इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** **2**

1) भाषेचे मूळ कोणी कशाला पाहावे ? (आज्ञार्थी करा.)
2) आपल्या गाण्याची किंमत पैशात करू नकोस. (प्रश्नार्थी करा.)
3) शेंगा खायला खूप मजा यायची. (उद्गारार्थी करा.)

**प्र.6. ई) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** **4**

(थक्क होणे, अश्रू गाळणे, सुन्न होणे, दिमाखात भर पडणे, दृष्ट लागणे, पोटात भूक न मावणे)

1) इमारतीवर तिरंगा ध्वज लावल्याने इमारतीचे सौंदर्य आणखी वाढले.
2) अपंग मुलांची चित्रकला पाहून प्रमुख पाहुणे आश्चर्यचकित झाले.
3) दिवसभर खेळत बसल्याने संध्याकाळी रमेशला खूप भूक लागली.

4) दुष्काळाची चाहूल लागल्यामुळे शेतकऱ्यांना दुःख व्यक्त करण्याशिवाय पर्याय उरला नाही.

5) भयंकर अपघाताची बातमी ऐकून गावकरी खिन्न झाले.

6) अलकाच्या बाळाला कोणाची तरी नजर लागल्यामुळे तो आजारी पडला.

**प्र.7.** अ) **खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** **4**

आईने वासंतीला सर्व प्रकारच्या कामांची सवय लावली. तिने तिला स्वयंपाक करावयास शिकविला. त्या दोघी जात्यावर दळणही दळत असत. दळताना त्या सुंदर गाणी म्हणत! वासंतीची कविता तिच्या गाण्यांवर पोसली आहे. आज अपंग वासंती स्वतःचे काम स्वतः करतेच; पण शिवाय घरातीलही सर्व काही करू शकते. याचे श्रेय ती आपल्या आईला देते.

'शरीर थकले तरी मनाने थकू नये' असे वासंतीची आई नेहमी म्हणे. ते तिच्या मनावर ठसले होते; म्हणूनच घरापासून दूर असलेल्या विद्यापीठात ती जाऊ शकते. तेथील जिने स्वतः चढून एम.ए.च्या वर्गात जाऊन बसते. अडचणींवर मात करणे जे नाही त्याबद्दल दुःख न करत बसता मार्ग काढणे, यातच माणसाचे माणूसपण आहे. दुःखाने खचून जाण्यात नाही, असेच वासंती समजते.

**प्र.7.** आ) **खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** **4**

1) **मुद्दे :** एक तलाव – बडबडे कासव – दोन बगळे – मैत्री – तलाव आटणे – दुसऱ्या तलावात जाण्याचा विचार – कासवाला उपाय सुचविणे – बगळ्यांनी काठीच्या मदतीने कासवाला घेऊन जाणे – कासवाचे मधेच बडबडणे – उंचावरून खाली पडणे – परिणाम – तात्पर्य.

2) **मुद्दे :** एक लहान बालक – गरीब आईबरोबर झोपडीत राहणे – पावसाळ्याचे दिवस – भयंकर वारा व पाऊस – रेल्वेरूळ उखडणे – त्याच्या नजरेत येणे – अंगातला तांबडा शर्ट काढून आगगाडी थांबवणे – प्रवाशांचा संताप – इंजिन ड्रायव्हरची रूळावर नजर पडणे – रूळ वाहून गेलेले – मुलामुळे प्रवाशांचे प्राण वाचणे – राष्ट्रपतीद्वारा मुलाचा सन्मान – तात्पर्य.

**प्र.7.** इ) **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** **4**

1) स्मिता / संदेश चव्हाण, विद्यार्थी प्रतिनिधी, आदर्श विद्यालय, नवी पेठ, नागपूर येथून मा. व्यवस्थापक, सोलापूर साखर कारखाना, सहकार नगर, सोलापूर येथे पत्र लिहून कारखाना पाहण्याची अनुमती मागते/मागते. (लिफाफा आवश्यक)

2) आनंद / अनिता सावंत, विकास हायस्कूल, कन्नमवार नगर, पुणे, येथून शाळेच्या क्रिकेट स्पर्धेच्या उद्‌घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी प्रसिद्ध क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर, ए-५, इंद्रवदन सोसायटी, सेना भवन, दादर यांना निमंत्रित करणारे पत्र लिहित आहे. (लिफाफा आवश्यक)

किंवा

**खालील विषयावर वृत्तांत लिहा.** **4**

तुमच्या शहरातील स्वच्छता अभियानाचा वृत्तांत लिहा.

किंवा

**खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** **4**

रेडिमेड कपड्यांच्या सेलची जाहिरात करा.

**प्र.8. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** **10**

1) शाळा बंद झाल्या तर........

**मुद्दे** :- ही कल्पना कशी सुचली ? - तुम्ही कसे वागाल - फक्त खेळ मनोरंजन - कल्पनेचे दुष्परिणाम - प्रगती नाही - सर्वत्र अज्ञानाचा अंधार - वाईट परिस्थिती - कल्पना भयंकर - शेवट.

2) किल्ल्याचे आत्मवृत्त

**मुद्दे** :- गौरवशाली इतिहास - थोर व्यक्तींचा सहवास - समाधान - वर्तमानातील अनुभव - वैभवाचा नाश - दुःख.

3) एक रम्य पहाट

**मुद्दे** :- प्रस्तावना - पहाटेचे वर्णन - पक्षांची किलबिल - गाईचे हंबरणे - पशू - पक्षी यांना झालेला आनंद - मनमोहक प्रसन्न वातावरण - स्वतःची भावनिक स्थिती - शेवट.

**Best Of Luck** 👍

**PAPER - VI**

# MT-162

**2014 .... .... 1100**

**MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM II - PAPER - VI**

**Time : 3 Hours** **Preliminary Model Answer Paper** **Max. Marks : 80**

| | | |
|---|---|---|
| उ.1. | **अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| 1) | पर्यायी विकासशैली यांचा विचार करायला हवा. | 1 |
| 2) | खेळ सुरू करण्यापूर्वी आम्ही अर्धा ते एक तास सूतकताई करीत असू. | 1 |
| 3) | बागेत फेरफटका मारावा, पुन्हा पुन्हा टेबलाशी येऊन बसावं. | 1 |
| 4) | रविवर्मा तसाच बंगलीच्या प्रवेशद्वारी गेला; आणि त्याच वेळी स्वामी विवेकानंदाचं दर्शन त्याला झालं. | 1 |
| उ.1. | **आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** | |
| 1) | ती एकमेकांशी बोलताना सहसा कुणाला आढळायची नाहीत. | 1 |
| 2) | रस्ता म्हणजे केवळ दोन बिंदूंना जोडणारं अंतर नव्हे. | 1 |
| 3) | पन्हाळ्याचे आठ दिवस भुर्रकन निघून जात. | 1 |
| उ.1. | **इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| 1) | 'माझे विद्यापीठ' या काव्यसंग्रहास एकूण 'अकरा' पुरस्कार मिळाले. | 1 |
| 2) | घर परमनंट होण्यासाठी नागिणीच्या पोरांनी मातीत सिमेंट मिसळायला सुचवले. | 1 |
| 3) | चंद्र होऊन चांदण्यांची विजार घातली. | 1 |
| उ.2. | **अ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** | |
| 1) | संदर्भ : वरील विधान 'माणुसकीचा झरा' या लेखिका 'चित्रलेखा पुरंदरे' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखिकेने 'आनंदवन' ही कुष्ठरोग्यांची वसाहत निर्माण करण्यामागे बाबा आमटे यांची असलेली संवेदनशीलता दाखवून दिली आहे.<br>स्पष्टीकरण : बाबांनी दुःखी-पिडितांच्या सेवेचे व्रत स्विकारले होते. या कार्यात त्यांना त्यांच्या पत्नी साधनाताईंची मोलाची साथ मिळाली. साधनाताईंनीही जीवनातील कष्टाचे व त्यागाचे महत्त्व आत्मसात केले होते. आपल्या पतीने स्वीकारलेल्या व्रतासाठी त्यांनीही स्वतःला समर्पित केले. कुष्ठरोग्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा वसा त्यांनी घेतला होता. त्याचवेळी वेळेवर योग्य ते उपचार न झाल्याने, महारोगी तुळशीरामाचा मृत्यू झाला. त्याच्या दुःखाने बाबांना खूपच दुःख झाले. त्यांनी आपल्या मनातील ही अस्वस्थता साधनाताईजवळ व्यक्त केली. आपल्या ध्येयाच्या पूर्ततेसाठी त्या पतीपत्नींनी आपले सारे जीवन आनंदाने समर्पित केले. दुःखाची तीव्रता कशी कमी करता येईल, वेदनेचे आनंदात | 3 |

| | | |
|---|---|---|
| | कसे रूपांतर होईल हा ध्यास या पतीपत्नीला लागला आणि त्यातून पुढे आनंदवनाची निर्मिती झाली.<br>**वैशिष्ट्य** : दुखितांप्रति असलेल्या सहानुभूतीचे दर्शन येथे घडते. | |
| 2) | **संदर्भ** : वरील वाक्य 'बाबूजी' या लेखक 'संजय गिरासे' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखकाने आपल्या मुला-मुलींसाठी आयुष्यभर कष्ट करणाऱ्या आईवडिलांकडे मुलांनी केलेल्या दुर्लक्षामुळे संवेदनशील मनाला खूप यातना होतात, याचे दर्शन घडविले आहे.<br>**स्पष्टीकरण** : बाबूजींनी खूप कष्ट करून आपल्या मुलांना शिकविले. त्यांच्या कष्टामुळे इंजिनीअर झालेल्या केशवने नाशिकला ऐश्वर्यसंपन्न बंगला बांधला. ज्यांच्यामुळे केशवला हे सुख अनुभवायला मिळत आहे, त्या वडिलांचे अस्तित्व लेखकाला बंगल्यात कुठेच जाणवले नाही. फक्त त्या बंगल्याला 'बाबूजी' हे नाव दिलेले होते. हे ऐकून लेखकाला खूप दुःख झाले. एकाक्षणी 'बाबूजी' ही अक्षरे रडत आहेत, असा त्याला भास झाला. पण थकून झोपलेल्या लेखकाला स्वप्नात बाबूजींनी उठवले आणि सांगितले की, आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत ज्याच्या सुखासाठी प्रयत्न केले त्याचं सुख पाहून अश्रू येणार नाहीत. मुलांनी सदैव सुखात राहावे अशीच वडिलांची इच्छा असते. ती माझी इच्छा पूर्ण झाली आहे. त्यामुळे मी दुःखी नाही, खूप सुखी आहे.<br>**वैशिष्ट्य** : येथे केशवच्या वडिलांच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो. | **3** |
| उ.**2.** | **आ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| 1) | 'परिवर्तनाचे उत्सव' हा पाठ लेखिका 'विद्या बाळ' यांनी लिहिला आहे. या पाठात निसर्गातील ऋतू बदलानुसार जे उत्सव साजरे केले जातात त्यात काळानुसार परिवर्तन करणे आवश्यक आहे, हा विचार मांडला आहे.<br>ऋतुबदलामुळे सारे वातावरण धुमारल्यासारखे, चैतन्यमय होते. लेखिकेला या ऋतुबदलाचा आनंद छानशा उत्साहानं मित्रमैत्रिणींबरोबर एकत्रितपणे साजरा करावासा वाटतो. पण त्याचे पारंपरिक स्वरूप मात्र बदलण्याची गरज लेखिकेला वाटते. आपल्या परंपरेने ऋतुबदलाची घेतलेली दखल लेखिकेला अतिशय संवेदनशील कृती वाटते. पण या कृतीमधला संकुचितपणा, त्यातला भेदाभेद, त्यातला आपपरभाव लेखिकेला त्रासदायक वाटतो. म्हणूनच या परंपरेमधील उत्सव साऱ्या जातीधर्मातील साऱ्या स्त्री-पुरूषांना सामील करून नव्या स्वरूपात साजरे करावे, असे लेखिकेला वाटते.<br>अशाप्रकारे ऋतूबदलाचा आनंद लेखिका सर्वांबरोबर एकत्रितपणे साजरा करू इच्छिते. | **3** |
| 1) | 'मास्तर आणि मी' हा पाठ लेखिका 'कृष्णाबाई सुर्वे' यांनी लिहिला आहे. या पाठात सुप्रसिद्ध कवी नारायण सुर्वे यांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांचे वर्णन केले आहे.<br>सुर्वे यांच्या कवितांची पहिली श्रोता कृष्णाबाईच असायच्या. कविता लिहून झाली की सुर्वे ती कविता लेखिकेला वाचून दाखवायचे. सुर्वे कविता लिहितात | **3** |

| | | |
|---|---|---|
| | यांचा आनंद लेखिकेलाही व्हायचा. पण तो आनंद कसा व्यक्त करायचा, हे त्यांना समजत नसे. अनेकदा संसाराच्या, पोराटोरांच्या विवंचनेत असल्यामुळे आणि उद्याच्या विचारात असल्यामुळे मास्तरांच्या कवितेचे शब्द त्यांच्या कानावर पडायचे, पण त्यातला भाव लेखिकेला समजायचाच नाही. कारण त्यांचे स्वतःचे मन त्यांना सांगायचे की कृष्णाबाई तुला काही कळतंय का त्यातले? कारण तू एक अडाणी बाई आहेस ? तुला काही समजणार नाही आणि बावळटासारखं उगाच काहीतरी बोलून स्वतःच हसू करून घेशील.<br>अशाप्रकारे कृष्णाबाई स्वतःच्या न्युनगंडामुळेच गप्प बसायच्या. म्हणूनच त्या म्हणतात, 'सुर्वे यांच्या कवितेतील भाव मला समजत नसे.' | |
| 3) | '<u>शाश्वत शिक्षणसंपत्ती</u>' हा पाठ लेखक '<u>चंद्रशेखर धर्माधिकारी</u>' यांनी लिहिला आहे. 'ज्या शिक्षकांकडून शिकायला मिळाले, जगायला मिळाले, तीच खरी शिक्षणसंपत्ती ठरली', ही लेखकाची स्वतःची भावना येथे व्यक्त होत आहे.<br>स्वायत्त गरिबीचा आनंद उपभोगत असतानाच लेखक बिनभिंतींच्या शाळेत अधिक शिकले. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते गांधीजींच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या नवभारत विद्यालयात दाखल झाले. त्यात 'जीवन शिक्षण' चालू असताना, १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात त्यांनी सक्रियपणे सहभाग घेतला. त्यात नेत्यांच्या आदेशानुसार शाळा बंद पाडली. संपूर्णतः अहिंसक सत्याग्रहाद्वारा भूमिगत राहून त्याही वयात समवयस्कांसोबत ते आंदोलन चालविले. त्यात काहीजणांना अटक झाली. काहीजणांना तुरुंगात डांबले गेले. परंतु लेखक वयाने लहान असल्यामुळे त्यांना तुरुंगात जावे लागले नाही पण त्यांनी भूमिगत राहून आंदोलन सुरू ठेवले.<br>अशाप्रकारे स्वातंत्र्याच्या व महात्मा गांधीजींच्या प्रेरणेने प्रभावीत होऊन लेखक 'भारत छोडो' आंदोलनात सहभागी झाले. | **3** |
| 4) | '<u>उरूसाचे दिवस</u>' हा पाठ लेखिका '<u>आशा आपराद</u>' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने पन्हाळगडावरील उरूसाच्या आठवणी सांगत बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविलेले आहे.<br>पन्हाळ्याच्या दरगाहला मुस्लिमांच्या इतकेच किंबहुना जास्तच हिंदू भक्त आहेत. सगळ्या पंचक्रोशीतून सर्व जातीधर्माचे लोक नारळ, मलीदा, पेढे, खडीसाखर, उदबत्ती घेऊन सजून सवरून स्त्रिया, मुलाबाळांसह दर्शनाला येतात. प्रचंड गर्दी असते. नारळाचा ढीग जमतो. मलिदा, पेढे घेता घेता आणि अंगारा देता देता मुजावर घामाघूम होतात. मुस्लिमांच्या मन्नतबरोबर हिंदूंच्या नवसाच्या तोरणांनी दरगाहचा छत भरून जातो.<br>अशा या विविध कारणांमुळेच पन्हाळ्याचा दरगाह म्हणजे हिंदू-मुस्लिम लोकांच्या एकतेचे प्रयत्न केलेल्या वलींचे स्थान आहे, असे आपराद म्हणतात. | **3** |

| | | |
|---|---|---|
| 5) | 'निसर्गवेध' हा पाठ लेखक 'बी. जी. वाघ' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने निसर्ग आपल्याला समृद्ध आणि आनंदी जगणे शिकवतो, हे दाखवून दिले आहे.<br>पहाटे सारा आसमंत नवलाईने फुलून आलेला होता. वा-याच्या जोरदार झटकाऱ्यांनी झाडे आनंदविभोर झालेली वाटत होती. पावसाची एखादी सर झरझरुन ओसरुन गेली असल्यामुळे वरचे आभाळ अगदी स्वच्छ, निळेशार दिसत होते. पूर्ण चंद्र सा-या वैभवात नटलेला होता. घननिळ्या आभाळातले चांदणे मनाला भूल घालत होते. पहाटेच्या निःस्तब्ध शांततेमध्ये कोकिळेचा कुहूऽकुऽहू आवाज मनाला धुंद करीत होता. हे सारे क्षण जपून ठेवावे, असे लेखकाला वाटत होते. कारण ऋतुचक्रांचे विभ्रम पुन्हा पुन्हा बघायला मिळतात. परंतु हा ऋतू, हा दिवस, हे क्षण पुन्हा पुन्हा येणार नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे निसर्गाला जुनं सोसवत नाही. त्याला नित्य नव्याचा सोस असतो म्हणूनच तर सगळी झाडे दरवर्षी बहरतात.<br>अशाप्रकारे वरील अनुभवामुळेच निसर्गाला नित्य नव्याचा सोस असतो, असे म्हटले आहे. | 3 |
| उ.3. | **अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| 1) | खरे सुख संसारात नाही. | 1 |
| 2) | मातीला कष्टाच्या भाकरीचा सुगंध यावा, असे कवीला वाटते. | 1 |
| 3) | घरट्यात कपाळाला आठी पडत नाही. | 1 |
| उ.3. | **आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** | |
| 1) | नको मंत्र त्याला **मुनिब्राह्मणांचे**. | 1 |
| 2) | डोळ्यापुढती येतो जेव्हा **आठवणीचा** गाव. | 1 |
| 3) | आपण जिजाऊच्या **पाती**. | 1 |
| उ.4. | **अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** | |
| 1) | **संदर्भ** : वरील पद्यपंक्ती 'आजि सोनियाचा दिवस' या 'संत सेना महाराज' यांच्या अभंगातून घेण्यात आल्या आहेत. संतांच्या सान्निध्यात मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन या अभंगामध्ये केले आहे.<br>**स्पष्टीकरण** : संतांच्या सहवासात खूप आनंद मिळतो. संत सान्निध्यात राहिल्यामुळे संत सेना महाराज यांच्या मनातील वाईट विचारांचा नाश झाला व मनाला शांतता लाभली. संतचरण दिसल्यामुळे मनाचा व शरीराचा सारा थकवा दूर झाला आहे. दिवाळी-दसरा आल्यावर आनंदाला तोटा नसतो. घरी सुखाचे, समाधानाचे वातावरण असते. त्याचप्रमाणे संतांच्या भेटीमुळे सेना महाराज यांच्या मनाला दिवाळी-दसऱ्याप्रमाणे आनंद झाला आहे.<br>**वैशिष्ट्य** : येथे संत सेना महाराजांची आनंदी मनोवस्था दिसून येते. | 3 |

| | | |
|---|---|---|
| 2) | **संदर्भ** : वरील पद्यपंक्ती 'एकत्वाचे गीत महान' या कवयित्री 'आश्लेषा महाजन' यांच्या कवितेतून घेण्यात आल्या आहेत. या कवितेत आपल्या देशात विविधतेत एकता कशी नांदते याचे सुंदर वर्णन केले आहे.<br>**स्पष्टीकरण** : देशाच्या महानतेचे वर्णन करताना कवयित्री म्हणते की, येथील नभांमध्ये तिरंगा ध्वज नेहमीच उंचच उंच फडकत आहे. येथील लोकांच्या मनात आजही गंगेचे पावित्र्य जपलेले आहे. येथे हिमनगाच्या उंचच उंच रांगादेखील आहेत. येथील चंद्र, सूर्य आणि मातीही आपणास समतेची शिकवण देतात. असा हा चंद्र, सूर्य आणि माती आम्हांला वंदनीय आहेत.<br>**वैशिष्ट्य** : भारतभूविषयी आदराची भावना येथे व्यक्त होते. | **3** |
| उ.**4.** | **आ) कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| 1) | 'गाव' ही कविता कवी 'अनिल पाटील' यांनी लिहिली आहे. या कवितेतून गावाबद्दलची ओढ व्यक्त झाली आहे.<br>कवीचे गाव निसर्ग सौंदर्याने नटलेले आहे. कवीला आपले गाव खूप खूप आवडते. परंतु असे असले तरी पोट भरण्यासाठी त्याला दूर शहरात जावे लागले. वीतभर पोटासाठी त्याला आपले लाडके गाव सोडावे लागले. त्यामुळे गावाच्या अनावर ओढीने त्याचे मन बेचैन होते, अस्वस्थ होते. अशा परिस्थितीमध्ये जेव्हा जेव्हा त्याच्या डोळ्यांसमोर त्याचे गाव आठवणींच्या रूपात दिसू लागते तेव्हा त्याच्या मनातील बेचैनीचे भाव निघून जातात. गावाच्या आठवणींमुळे त्याच्या मनाला शांतता, समाधान लाभते.<br>अशाप्रकारे जेव्हा कवीला त्याचे गाव आठवणीतून डोळ्यांसमोर दिसते तेव्हा त्याच्या मनातील बेचैनीचे भाव नाहीसे होतात. | **3** |
| 2) | 'किती हे सुख' हा अभंग 'संत सोयराबाई' यांनी लिहिला आहे. या अभंगात स्वतःच्या स्वार्थात, मी पणात गुंतलेल्या व्यक्तीची फजिती होते, याचे वर्णन केले आहे.<br>मृगजळ म्हणजे पाण्याचा आभास असतो. मृगजळ हे नेहमी फसवे असते. संसारातील सुखही असेच मृगजळासारखे असते. हे कळत असूनही माणसे संसारातच खरे सुख मानतात. मोहमायेतच ते अडकून पडतात. आकाशातील ढगांची सावली अस्थिर व क्षणभंगूर असते. तसेच संसारातील सुख हे क्षणभंगूर असते. माणसे मोक्षाचा विचार न करता स्वतःच्या सुखासाठी मी, माझे हा अहंकार बाळगतात. त्याचे मन नेहमीच पत्नी, मुले, धन यातच गुंतलेले असते. पण यातून मिळणारे सुख मृगजळाप्रमाणेच असते. या वासनारूपी मोहजालात अडकल्यामुळे जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून त्यांची कधीच सुटका होत नाही. शेवटी त्यांना मोक्ष मिळत नाही.<br>अशाप्रकारे संत सोयराबाई यांनी माणसाला मोहमायेत अडकवणाऱ्या संसाराची तुलना मृगजळाबरोबर केली आहे. | **3** |

| | | |
|---|---|---|
| 3) | ‘जिथे राबती हात’ ही कविता कवी ‘गजानन माडगूळकर’ यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने आपल्या जीवनातील श्रमाचे महत्त्व सांगितले आहे.<br>कवी ग. दि. माडगूळकर म्हणतात की, ज्या ठिकाणी माणसे कष्ट करतात, घाम गाळतात तेथे विविध रूपात परमेश्वर उभा राहतो. शेतकरी आपल्या शेतात खूप राबतात, मेहनत करतात. त्याठिकाणी अन्नाच्या रूपात परमेश्वर उभा राहतो. अशा शेतात परमेश्वराचे सावळे रूप दिसते. पाथरवट लोक रस्त्यावर बसून दगड फोडतात. दगडांना विविध आकार देतात. शिवाय विणकर लोक कापसापासून सुंदर कापड तयार करतात. अशा मेहनत करणाऱ्या लोकांच्या घरी परमेश्वर आनंदाने राहतो.<br>अशाप्रकारे कवीच्या मते, ज्या ठिकाणी कष्ट केले जातात, त्याठिकाणी परमेश्वराचे दर्शन घडते. | 3 |
| 4) | ‘प्रलय’ ही कविता कवी ‘रोहिदास पोटे’ यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने माणसातील माणूसपण कोणत्याही बंधनांनी जखडलेले नसावे, असा विचार व्यक्त केला आहे.<br>मानवी समाजामध्ये प्रलय निर्माण व्हावा, असे कवीला वाटते. जेणेकरून एकाच आकाराची, विचाराची, उंचीची, भेदाभेदरहित घरे निर्माण व्हावीत. माणसाला बदलण्यासाठी व माणसाला माणूस म्हणून किंमत यावी यासाठी नवीन विचारांचा समाज निर्माण व्हावा. विषमता नष्ट होऊन सर्वत्र समानता निर्माण व्हावी. ‘माणूस’ व ‘माणुसकी’ यांचे अतूट नाते निर्माण व्हावे. माणसाने माणसाशी माणूस म्हणून वागावे. मातीलाही कष्टाच्या भाकरीचा सुगंध प्राप्त व्हावा.<br>अशाप्रकारे प्रलय होताना मानवी समाजात कवीला सकारात्मक बदल अपेक्षित आहे. | 3 |
| 5) | ‘माझ्या घरट्यात’ ही कविता कवी ‘सूर्यकांत खांडेकर’ यांनी लिहिली आहे. या कवितेत भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती अधिक महत्त्वाची असते, हा संदेश व्यक्त होतो.<br>भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती महत्त्वाची असते. त्याबाबत कवी म्हणतो, त्याच्या घरट्यात म्हणजेच घरात हिऱ्यामाणकांची रास नाही. म्हणजेच त्याच्याकडे मौल्यवान वस्तू नाहीत. त्याच्या घरट्यात कल्पफुलांचा संभार म्हणजेच कल्पनेतील फुलांचा साठा नाही. कवीच्या घरात भौतिक ऐश्वर्य कुठेच दिसत नाही. त्याच्या घरी चांदरातीचे मोहोळ म्हणजेच केवळ स्वप्नरंजकता नाही. कवीच्या घरात एकतारी एकस्वर असल्यामुळे सातसुरांचा झंकार म्हणजेच वाद, संघर्ष दिसत नाही. शेवटी कवी म्हणतो की, त्याच्या घरात सुखासमाधानाचे वातावरण असल्यामुळे तेथे कधीही कोणाच्याही कपाळाला आठी दिसत नाही.<br>अशा या विविध गोष्टी कवीच्या घरट्यात नाहीत. | 3 |
| उ. **5.** | **खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** | |
| 1) | ‘नातवंडांस पत्र’ हा पाठ लेखिका ‘मृणालिनी साराभाई’ यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जीवन जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून दिला आहे. | 4 |

| | | |
|---|---|---|
| | पाण्याचे महत्त्व सांगताना अम्मा लिहिते की, स्नान करताना आपण पर्वतांमधून, खोल खोल दऱ्याखोऱ्यांमधून व महान नद्यांतून येणाऱ्या आशीर्वाद स्वरूप पाण्याचे स्मरण ठेवावे. कोणतेही जीवन पाण्याविना अशक्य आहे. पिण्यासाठी जर एकही थेंब मिळाला नाहीतर आपली अवस्था खूप वाईट होईल. तेव्हा पाण्याबाबत खबरदारी घ्यावी. त्याचा एकही थेंब वाया जाणार नाही, याची काळजी घ्यावी. आपण देशातील जलस्त्रोत स्वच्छ ठेवायला मदत करायला हवी, अशी शपथ घेऊया. ज्यामुळे सगळ्या लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळेल. त्याचबरोबर पाण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे.<br>अशाप्रकारे अम्मा पत्रातून पाण्याचे महत्त्व नातवंडांना समजावून सांगते. | |
| 2) | 'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व' हा पाठ लेखक 'आनंद यादव' यांनी लिहिला आहे. या पाठात एकच मराठी संस्कृती असलेल्या खेड्यांची, शहरांची वेगवेगळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये व त्यातून दिसणारे त्या त्या गावाचे व्यक्तिमत्त्व यांचे वर्णन लेखकाने केले आहे.<br>प्रत्येक गावाची आपली एक संस्कृती असते. ती तेथील परंपरेमुळे निर्माण झालेली असते. हे समजावताना लेखक म्हणतात की, पश्चिम महाराष्ट्राच्या एकाच पट्ट्यातील गावे एकसारखी नाहीत. त्यांची संस्कृती वेगळी आहे. कागल तालुक्यातील 'सागाव' हे पानमळ्याचे गाव म्हणून ओळखले जाते. 'सिद्धनेली' हे भात पिकविण्यासाठी प्रसिध्द आहे. 'कापशी' या गावातील सणगर समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात घोंगड्यांचे उत्पन्न काढतात. सातारा जिल्ह्यातील एक गाव शिक्षकांचे गाव म्हणून ओळखले जाते. तेथील माणसे शिकून शिक्षक होण्याचा प्रथम प्रयत्न करत असतात. पुणेरी पगडी, पैठणचा शालू, जेजूरीचा भंडारा, पंढरपूरचा बुक्का, सोलापूरची चादर ही स्थानिक गावांची वैशिष्ट्ये आहेत. त्या त्या गावांच्या त्या त्या वस्तू प्रतिष्ठेच्या समजल्या जातात त्यामुळे ती त्यांची संस्कृती बनलेली दिसते.<br>दूधकट्ट्यावर सकाळच्या वेळी दुधाच्या धंद्यासाठी जाणाऱ्या म्हशी हे कोल्हापुरच्या संस्कृतीचे एक वैशिष्ट्य आहे. त्याच सकाळच्या वेळी पहिलवानांचा समूहही दुधकट्ट्यावरील दूध पिऊन आखाड्यात मेहनत करतो. काही पैलवान पंचगंगेच्या घाटावर आंघोळीसाठी जातात. पंढरपूरच्या चंद्रभागा स्नानाला मात्र पावित्र्याचा स्पर्श आहे. दोन्ही गंगास्नानेच आहेत पण त्यामागची सांस्कृतिक भावना वेगळी आहे. पंढरपूरची संस्कृती वर्षातून दोनदा येणाऱ्या वारीवर बेतलेली आहे. ती विठ्ठलाच्या मंदिराच्या केंद्राभोवती निर्माण झाली आहे. त्याचबरोबर लाल लाल मातीच्या रस्त्यांचे देखणेपण आणि मासळी बाजारातील उग्र वास ही रत्नागिरीची ओळख आहे.<br>अशाप्रकारे वरील उदाहरणांमुळेच 'गावाची संस्कृती स्थानिक परंपरांतून निर्माण झालेली असते' हे स्पष्ट होते. | **4** |

3) ‘प्रतिसरकार’ हा पाठ लेखक ‘नागनाथअण्णा नायकवडी’ यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे. **4**

गावा-गावांतील स्वातंत्र्यचळवळीच्या दृष्टीने विधायक कार्य करणाऱ्या लोकांना एकत्र आणून राष्ट्रीय आंदोलनाची वाढ कशी होईल याचा विचार केला जात होता. त्याचबरोबर वेगवेगळ्या तालुक्यांत अनेक गावांतून सभा व परिषदा घेतल्या जायच्या. तेथे शाहिरी व कवने म्हणणाऱ्या मुलांना प्रोत्साहन दिले जायचे. राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेल्या तरूणांना व गरीब आणि सत्प्रवृत्तीच्या लोकांना संघटित व्हायला प्रोत्साहन दिले जायचे. गावा-गावांत राष्ट्रीय आंदोलनाची वाढ व्हावी यासाठी राष्ट्रीय विचारांच्या व्यक्तींना आणून व्याख्याने आयोजित केली जात असत. खादी वापराचा प्रचार केला जात असे. सत्याग्रह, व्यसनमुक्ती, शारीरिक जोपासना, संघटित सामर्थ्याचे महत्त्व याकडे कटाक्षाने लक्ष दिले जायचे. रचनात्मक आदर्श समाज घडविण्यासाठी अनेक सामाजिक नीतिमुल्ये निर्माण केली. साक्षरताप्रसार, अस्पृश्यतानिवारण, स्त्री-पुरूष समानता, हुंडाबंदी, अंधश्रद्धा निमूर्लन, गांधी-विवाह पद्धती, ग्रामस्वच्छता, सामाजिक न्याय प्रस्थापना इत्यादी कार्यक्रम राबविले.

अशाप्रकारे स्वातंत्र्य चळवळीत त्याग, बलिदान, राष्ट्रप्रेम व समाजहिताची तळमळ यांच्याद्वारे विविध विधायक कामे केली गेली.

4) ‘मुलांचे स्वप्न’ हा पाठ लेखिका ‘सोनाली नवांगुळ’ यांनी लिहिला आहे. या पाठात मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे. **4**

जुईची आई वाचनालयात कामाला जायची आणि बाबा घरातल्या हॉलमध्ये मुलांची शिकवणी घ्यायचे. खूप मुले-मुली त्यांच्याकडे शिकायला यायची. जुईची आई घरातली शक्य तितकी कामं करून वाचनालयात जाते. जुईचे बाबा जुईला जेवायला वाढतात आणि मग स्वतः जेवून भांडीही धुवून ठेवतात. जुई जेव्हा शाळेतून येते, तेव्हा जुईची आई भाजी, दळण घेऊन येत असते. ती यायच्या आधीच जुईचे बाबा मस्त चहा करतात आणि सगळे चहा पितात. जुईची आई पटकन चटमट खाऊ करते. नंतर बाबा क्लास घ्यायला तयार होतात. जुई खेळून आल्यावर जुईचे आई किंवा बाबा जुईचा अभ्यास घेतात. जुईची आई स्वयंपाक करते. बाबा ताटं घेतात. मग सगळे मिळून जेवतात.

अशाप्रकारे जुईचे आईबाबा सहकार्याने घरातली सारी कामे करतात.

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.**

1) ‘नातवंडांस पत्र’ हा पाठ लेखिका ‘मृणालिनी साराभाई’ यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जीवन जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून दिला आहे. **8**

लेखिका आपल्या नातवंडांना पूर्णपणे ओळखते. त्यांच्या सवयी तिला माहिती आहेत. जगातील हिंसा, अभिलाषा, मत्सर या दुष्प्रवृत्तीपासून तिला आपल्या नातवंडांस वाचवायचे

| | | |
|---|---|---|
| | आहे आणि म्हणून ती त्यांना म्हणते जेव्हा तुम्ही मोठे व्हाल तेव्हा या शत्रूंना जिंकून घ्या. यासाठी दिवसाची सुरूवात प्रार्थनेने करा. त्यामुळे मनातील वाईट विचार दूर होतील. एकत्र खेळण्याने एकोपा वाढतो. पण असे साधे खेळ खेळतानासुद्धा कुणाचा द्वेष करू नका.<br>ज्या धरतीने तुमचे पालनपोषण केले तिचे ऋण मानायला विसरू नका. पाणी हे जीवन आहे, त्याचा जपून वापर करा. निसर्गाचे संवर्धन करा. निसर्गाचा समतोल कायम ठेवायचा असेल, पाऊस चांगला पडायला हवा असेल तर वृक्षांची जोपासना करायलाच हवी. जो शेतकरी त्याच्या देशासाठी अन्न पिकवतो त्याला किती कष्ट घ्यावे लागतात याचा विचार करा. आपण ब्रेड आणि लोणी ही न्याहारी करताना त्यासाठी कोणी किती कष्ट घेतले असतील याचा विचार करा. पुस्तक हे मित्र आहेत. तेव्हा ती वापरताना त्यांची काळजी घ्या. त्या पुस्तकात अनमोल ज्ञानाचे भांडार असते. पुस्तकातील शब्द म्हणजे मौज, कुतूहल असते. त्या शब्दांवर प्रेम करा. त्यांना वाचा म्हणजे सारे जग तुमच्यासाठी खुले होईल.<br>अशाप्रकारे शेवटी लेखिका आपल्या नातवंडास सांगते, स्वतः जगा व दुसऱ्यास जगू द्या. आपले जीवन इतरांना आनंद देण्यासाठी असावे. सर्वांना मदत करा आणि आपल्या कार्याने साऱ्या जगासाठी तुम्हीच आशीर्वाद व्हा. | |
| 2) | 'प्रतिसरकार' हा पाठ लेखक 'नागनाथअण्णा नायकवडी' यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे.<br>लेखक नागनाथअण्णा नायकवडी यांनी मॅट्रिकचे शिक्षण अर्धवट सोडून स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात लेखकाने सक्रिय सहभाग घेतला. तसेच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारच्या स्थापनेत ते क्रियाशील सदस्य होते.<br>१९४२ साली मुंबई येथील गवालिया टँक येथे गांधीजींनी इंग्रज सत्तेच्या विरूद्ध 'चले जाव' आंदोलनाचा नारा दिला. त्यावेळी अनेक राष्ट्रीय नेत्यांना अटक झाली. अनेक ठिकाणी प्रचंड जमावांनी इंग्रज सत्तेविरूद्ध असंतोष व चीड व्यक्त करण्यासाठी पोलीस ठाणे, पोष्ट, टेलिफोनच्या तारा तोडल्या गेल्या. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी हरताळ पाळले होते. मामलेदार कचेरीवर मोर्चे निघाले होते.<br>याच काळात देशात काही ठिकाणी इंग्रजांचा कायदा मानायचा नाही, स्वतःचे स्वतंत्र सरकार निर्माण करायचे या विचाराने 'प्रतिसरकार' निर्माण करावयाची कल्पना पुढे आली. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली 'सातारा' येथे स्थापन झालेले 'प्रतिसरकार' दीर्घकाळ टिकले. प्रतिसरकारच्या कार्यकर्त्यांकडून गावागावात ऐक्य निर्माण करून मतभेद मिटविण्याचा प्रयत्न केला जात होता. गावांत शांतता नांदेल याकडे कटाक्षाने पाहिले जात होते. राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेल्या तरूणांना व गरीब आणि सत्प्रवृत्तीच्या लोकांना संघटित व्हायला प्रोत्साहन दिले जायचे. राष्ट्रीय आंदोलनात वाढ व्हावी म्हणून सभा परिषदा घेतल्या जायच्या. खादीचा प्रचार केला जायचा. सत्याग्रह, व्यसनमुक्ती, शारीरिक जोपासना, | 8 |

| | | |
|---|---|---|
| | संघटित सामर्थ्य याकडे लक्ष दिले जायचे. सामाजिक नीतिमूल्ये निर्माण केली जायची. साक्षरताप्रसार, अस्पृश्यतानिवारण, स्त्री-पुरूष समानता, हुंडाबंदी, अंधश्रद्धा निमूर्लन, गांधी-विवाह पद्धती, ग्रामस्वच्छता, सामाजिक न्याय प्रस्थापना कार्यक्रम राबविले जायचे. परंतु काही वाईट प्रवृत्तींच्या लोकांनी हे प्रतिसरकार बदनाम करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण प्रतिसरकारने या वाईट प्रवृत्तींच्या लोकांचा बंदोबस्त करण्यासाठी सुव्यवस्था, न्यायनिवाडा यांची कडक अंमलबजावणी केली. | |
| उ.**6.** | **अ) खालीलपैकी कोणतेही <u>एक</u> वाक्य लेखननियमानुसार लिहा.** | |
| 1) | साऱ्या <u>**जातीपातींचे**</u>, <u>**धर्मांचे**</u> अडसर ओलांडायचे. | **2** |
| 2) | भगवा <u>**अंगरखा**</u> आणि त्याच रंगाचं <u>**पायी**</u> धोतर होतं. | **2** |
| उ.**6.** | **आ) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** | |
| 1) | वृक्षलता - वृक्ष आणि लता - इतरेतर द्वंद्व समास | **1** |
| 2) | पैसाअडका - पैसा, अडका वगैरे - समाहार द्वंद्व समास | **1** |
| 3) | तीमजली - तीन मजल्यांचा समूह - द्विगू समास | **1** |
| 4) | यशापयश - यश किंवा अपयश - वैकल्पिक द्वंद्व समास | **1** |
| उ.**6.** | **इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** | |
| 1) | भाषेचे मूळ कोणीही पाहू नका. | **1** |
| 2) | आपल्या गाण्याची किंमत पैशात करशील का ? | **1** |
| 3) | किती मजा यायची शेंगा खायला ! | **1** |
| उ.**6.** | **ई) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** | |
| 1) | इमारतीवर तिरंगा ध्वज लावल्याने इमारतीच्या <u>**दिमाखात भर पडली**</u>. | **1** |
| 2) | अपंग मुलांची चित्रकला पाहून प्रमुख पाहुणे <u>**थक्क झाले**</u>. | **1** |
| 3) | दिवसभर खेळत बसल्याने संध्याकाळी रमेशच्या <u>**पोटात भूक मावत नव्हती**</u>. | **1** |
| 4) | दुष्काळाची चाहूल लागल्यामुळे शेतकऱ्यांना <u>**अश्रू गाळण्याशिवाय**</u> पर्याय उरला नाही. | **1** |
| 5) | भयंकर अपघाताची बातमी ऐकून गावकरी <u>**सुन्न झाले**</u>. | **1** |
| 6) | अलकाच्या बाळाला कोणाची तरी <u>**दृष्ट लागल्यामुळे**</u> तो आजारी पडला. | **1** |
| उ.**7.** | **अ) खालील उतारा वाचून त्यावर <u>चार</u> प्रश्न तयार करा.** | |
| 1) | आईने वासंतीला कोणत्या कामांची सवय लावली ? | **1** |
| 2) | वासंतीची आई नेहमी काय सांगायची ? | **1** |
| 3) | वासंती कोणत्या वर्गात स्वतः जाऊन बसते ? | **1** |
| 4) | माणसाचे माणूसपण कशात आहे ? | **1** |

| | | |
|---|---|---|
| उ.**7.** | आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक) | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 64 - Q.22 | **4** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 60 - Q.16 | **4** |
| उ.**7.** | इ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 96 - Q.11 | **4** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 90 - Q.05 | **4** |
| | किंवा | |
| उ.**7.** | इ) खालील विषयावर वृत्तांत लिहा. | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No.104 - Q.12 | **4** |
| | किंवा | |
| उ.**7.** | इ) खालील विषयावर जाहिरात लेखन करा. | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 113 - Q.12 | **4** |
| उ.**8.** | खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा. | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 27 - Q.24 | **10** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 43 - Q.39 | **10** |
| 3) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 15 - Q.13 | **10** |

❑❑❑❑❑